CR1967020922

परिपत्रक

क्रमांक कॉन/एल.आर. ३४
पुणे दिनांक २-९-१९६७

विषय :- जमीन एकत्रीकरण योजना कार्यान्वित करण्याबाबत.

मंजूर योजने प्रमाणे संबंधित खातेदारांना ताबे देतेवेळी खातेदाराकडून बदललेल्या जमीनीचे ताबे सोडल्याबद्दल व गटाचे ताबे मिळाल्याबद्दल कब्जे पावत्या घेण्यात येतात. तथापि काही जमिनी ऊस, केळी अथवा किंमती उत्पन्नाची पीके असल्याने अशा जमिनीचे ताब्याचे बाबत अडचणी उद्भवतात. योजनेतील गट जर आपसांत संमतीने जबाबाने झाले असतील तर ताबे देण्या/घेण्यातील या संभाव्य अडचणी बद्दलचा खुलासा जबाबात करून घेणे जरूरीचे आहे. पीकासह ताबे देण्या/घेण्याबद्दलचा उल्लेख गट तयार करतेवेळी संमती जबाबात करणे आवश्यक आहे. जर ऊस, केळी वगैरे किंमती उत्पन्नाच्या पीकाबाबत योजना तयार करतांना विचार केला गेला नसेल तर जमिनीचा ताबा देताना उभ्या पिकाची किंमत का.क. २१(४) अन्वये करुन ताब्याच्या कामाची पूर्तता करणे शक्य आहे. पिके निघाल्यानंतर आपसांत ताबे घेण्यास संबंधित खातेदार तयार असतील तर तूर्त लाक्षणिक ताबा ( syboli cal possession ) घेण्यास तयार असल्यास तसा कब्जेपावत्यावर उल्लेख करुन घेऊन लाक्षणिक ताबा दिला/घेतल्याबद्दल कब्जे पावत्यावर खातेदारांच्या सह्या घेतल्या पाहिजेत. खातेदारांची त्यांच्या सोईच्या दृष्टीने ताबे देण्या/घेण्याबाबत स्वतंत्र जबाबात मागून घेतलेल्या मुदतीनंतर खातेदारांनी मंजूर योजने प्रमाणे मंजूर योजनेत बदलेल्या जमिनीचे ताबे प्रत्यक्षात सोडल्याबद्दल व गटाप्रमाणे ताबे घेतल्याबद्दल सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांनी खात्री करावयास पाहिजे. तसेच काही ठिकाणी ऊस, केळी अथवा किंमती उत्पन्नाच्या उभ्या पिकासह ताबे दिले/घेतले जातात अशावेळी पिकासह ताबे दिले/घेतल्या बद्दल त्यांचा स्पष्ट उल्लेख कब्जे पावतीवर करणे इष्ट आहे.

वरील प्रमाणे कब्जेपावत्या घेतल्याशिवाय व किमान लाक्षणिक ताबा दिल्याशिवाय कब्जा देण्याचे काम पूर्ण झाले आहे असे मानता येणार नाही.

वरील प्रमाणे ताबे घेतले आहेत किंवा कसे याबाबत एकत्रीकरण अधिकारी यांनी त्यांच्या तपासणीवेळी खात्री करुन वेळोवेळी सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांना सूचना द्याव्यात.

स्थळ प्रतीवर जमाबंदी आयुक्त )
यांची स्वाक्षरी असे. )

सही ×××.
(ग. म. जोगळेकर)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
यांचे करितां.

क्रमांक कॉन/एल.आर. ३४
// खरी नक्कल // पुणे दिनांक २-९-१९६७

क्रमांक कॉन/एल.आर. ३४

पुणे दिनांक 9 -८-१९८२

सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी, सर्व

विषयः- जमीन एकत्रीकरण योजना
कार्यान्वित करण्याबाबत.

संदर्भः- शिकडील क्रमांक कॉन/एल.आर. ३४ दि. १८-७-१९८२

योजना कार्यान्वित करताना घ्यावयाचे खबरदारी बाबत व त्याबाबत त्रुटीया राहू नयेत म्हणून सविस्तर सूचना शिकडील क्र. सम दिनांक १८-७-८२ अन्वये दिलेल्या आहेत. योजना तयार करतेवेळी अदलाबदल करण्यात आलेल्या जमीनीत ऊस, केळी अथवा किंमती उत्पन्नाची पिके असल्यास ताबे देण्या घेण्यातील संभाव्य अडचणी लक्षात घेवून जबाबातच त्याबाबत उल्लेख करण्याविषयी व ताबे कामाविषयी शिकडील परिपत्रक क्रमांक सम दिनांक २-९-६७ ने ज्या सूचना दिल्या आहेत त्याची प्रत यासोबत जोडली आहे. सदरील परिपत्रकातील सूचना लक्षात घ्याव्यात व त्यामध्ये नमूद केल्या प्रमाणे ताबेकामाचे वेळी अडचण आल्यास त्याबाबत कार्यवाही सूचनानुसार करावी.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
यांचे करितां.

प्रतिलीपीः- उपसंचालक भूमि अभिलेख सर्व यांच्याकडे माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रतिलीपीः- एकत्रीकरण अधिकारी सर्व यांच्याकडे माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

आपल्या तपासणीत याबाबतची पडताळणी करण्याची कार्यवाही करावी.

OFFICE OF THE
CONSOLIDATION OFFICER
SATARA
Received on 31/6/82
Compilation No. ...

क्रमांक कॉन/एल.आर. ३४
पुणे दिनांक 9 -८-१९८२